महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ३३६ वा दिनांक : १९/११/२०२५ वार : बुधवार

## अदृष्य शक्तीचा आशीर्वाद राहिला तर युती कायम टिकेल- समरजित घाटगे



**कोल्हापूर** : कागल नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे लक्ष वेधून घेणारी एक महत्त्वपूर्ण राजकीय घडामोड झाली आहे. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हसन मुश्रीफ आणि त्यांचे कट्टर राजकीय विरोधक समरजित घाटगे हे आता एकत्र आले आहेत. हसन मुश्रीफ यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि समरजित घाटगे यांच्या नेतृत्वाखालील शाहू विकास आघाडीने ही युती केल्याने कागलमधील स्थानिक राजकारण पूर्णपणे बदलले आहे. ही युती केवळ निवडणुकीपुरती नसून, आम्ही एकत्र आलो ते कायम एकत्र राहण्यासाठी, असे वक्तव्य हसन मुश्रीफ यांनी केले आहे.

या युतीवर भाष्य करताना समरजित घाटगे यांनी स्पष्ट केले की, त्यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची परवानगी घेऊनच स्थानिक पातळीवर हा निर्णय घेतला आहे. समरजित घाटगे, जे सध्या शरद पवारांच्या राष्ट्रवादीत आहेत, त्यांनी शाहू विकास आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. शरद पवारांनी स्थानिक पातळीवर युती करण्याची परवानगी दिल्याची माहिती त्यांनी दिली. अदृश्य शक्तीचा आशीर्वाद असेल तर ही युती कायम टिकेल, असा विश्वासही समरजित घाटगे यांनी यावेळी व्यक्त केला.

पत्रकार परिषद घेत समरजित घाटगे म्हणाले, कागल, मुरगुड नगरपालिकांच्या विकासासाठी एकत्र आलो आहोत. येत्या काळात एक चांगले व्हिजन घेऊन आम्ही एकत्रितपणे सामोरे जात आहोत. या काळात चांगला कारभार आम्ही करू. जी ताकद आम्ही एकमेकांच्या विरोधात लावतो तीच ताकद आता शहराच्या विकासासाठी लाऊ. तसेच कागल आणि मुरगूडमध्ये जो काही फॉर्म्युला ठरला आहे तो वरिष्ठ पातळीवर ठरला आहे. त्यामुळे आपण सर्वांनीच आता त्याचे पालन करून पुढे गेले पाहिजे, असे आवाहन समरजित घाटगेंनी केले.

अदृष्य शक्तीचा आशीर्वाद राहिला तर ही युती कायम टिकेल

पुढे बोलताना समरजित घाटगे म्हणाले, हसन मुश्रीफ आणि आपल्यामध्ये चांगले समन्वय असून कागलसाठी ही युती करण्यात आली आहे. कागलच्या विकासासाठी सत्तेच्या माध्यमातून विकास करू. कोणावरही अन्याय होणार नाही याची आम्ही काळजी घेऊ. हसन मुश्रीफांनी एक पाऊल पुढे टाकले, आता आम्ही एक पाऊल पुढे टाकले आहे. अदृष्य शक्तीचा आशीर्वाद राहिला तर ही युती कायम टिकेल अशी अपेक्षा आहे, असे समरजित घाटगे म्हणाले.

## प्रत्येकजण आपला पक्ष वाढवण्याच्या प्रयत्नात असतो : अजित पवार

**मुंबई** : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेच्या मंत्र्यांनी आजच्या मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार टाकला. भाजपवर मित्रपक्षांचे पदाधिकारी फोडण्याचा आरोप करत शिवसेनेने ही भूमिका घेतली. त्यामुळे ऐन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राज्याचे राजकारण तापल्याचे पाहायला मिळाले. यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता त्यावर त्यांनी याबद्दल आपल्याला काही माहित नसल्याचे उत्तर दिले आहे.

अजित पवार म्हणाले, मला नाराजी बद्दल काही माहित नाही, मला असे काही जाणवले देखील नाही. मला असे वाटले की कारण आमचे पण बरेच मंत्री नव्हते आणि मला असा समाज झाला की आज छाननी आहे, नगरपालिका आणि नगरपंचायतीची त्यामुळे हे लवकर गेले असा माझा समज होता. मला असे काही जाणवले असते की नाराजी असेल तर मी लगेच एकनाथ शिंदे यांना विचारले असते, अशी प्रतिक्रिया अजित पवारांनी दिली आहे.

प्रत्येक जण आपला पक्ष वाढवण्याच्या प्रयत्नात असतो

तसेच प्रत्येक जण आपापले पक्ष वाढवण्याचा प्रयत्न करत असतो. हे प्रमाण निवडणुकीच्या काळात वाढलेले असते. तिकिटे देण्याच्या निमित्ताने वाढते आणि त्याच्यातून आज उपमुख्यमंत्री आणि बाकीचे सहकारी मी तिथे नव्हतो पण एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री यांच्यात बैठक झाली होती, असे माझ्या कानावर आले होते.

अजित पवार म्हणाले, आज मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बिबट्याचा खूप मोठ्या प्रमाणावर जो काही एकंदरीत संख्या वाढली आहे आणि अनेक लोकांचे जीव गेले आहेत आणि खूप भीतीचे वातावरण राज्यातील अनेक भागात, नाशिक असेल, अहिल्यानगर जिल्हा, कोकणातील रत्नागिरी या भागांमध्ये बिबट्यांची संख्या वाढत आहे. याचा बंदोबस्त कसा करायचा या विषयवार मुख्यमंत्र्यांनी बैठक आयोजित केली होती. त्यानुसार अशा भागांमध्ये शाळेचा वेळ हा ९.३० ते ४.०० असा केला आहे. ज्यामुळे साधारण दुपारची वेळ असतानाच मुलं घरी यावीत, असा निर्णय घेतला गेला आहे.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले, दुसरे म्हणजे तिथले पिंजरे आणि बाकीच्या कामांना, जसे आम्ही पुणे जिल्ह्याला साडे अकरा कोटी दिले, तसे अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच तिथले एसपी, सीपी यांनी देखील गस्त वाढवावी, अशा पद्धतीच्या सूचना आजच्या बैठकीत देण्यात आल्या आहेत. केंद्र सरकारशी बोलून त्यांना जे काही बिबटे पकडायचे आहेत तसेच जुन्नरच्या परिसरात माणिकडोहला बिबट्यांचे एक केंद्र सुरू केले आहेत, तशी दोन सेंटर सुरू करायची आणि हे बिबटे पकडून तिकडे न्यायचा निर्णय झाला आहे.

## राज ठाकरेंचे हिंदुत्व शरीरावर चिटकलेल्या त्वचेसारखे : प्रकाश महाजन

**धाराशिव** : काही महिन्यांपूर्वी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला 'जय महाराष्ट्र' केलेले ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांनी आज पहिल्यांदाच मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्यावर हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून घणाघाती टीका केली आहे. राज ठाकरेंचे हिंदुत्व शरीरावर चिटकलेल्या त्वचेसारखे असे त्यांनी म्हटले आहे. राज ठाकरेंनी हिंदुत्वाचा व्यापक दृष्टिकोनातून विचार करावा, त्यांनी हिंदुत्वाचा मुद्दा का सोडला हे कळत नाही, असे म्हणत महाजन यांनी मनसेप्रमुखांना लक्ष्य केले. 'शरीरावर चिटकलेल्या त्वचेसारखे राज ठाकरेंचे हिंदुत्व' अशी कठोर व्याख्या करत महाजन यांनी टीकास्त्र सोडले. तसेच, महानगरपालिका निवडणुकीतील मतांसाठी राज ठाकरे यांनी हिंदुत्वाबाबत मवाळ भूमिका घेतल्याचाही त्यांनी गंभीर आरोप केला. प्रकाश महाजन यांनी राज ठाकरेंचा गंगेतील स्नान आणि पाण्याच्या मुद्द्यावर जाहीर व्यासपीठावरुन मांडलेल्या भूमिकेचा व्हिडिओ दाखवत जोरदार टीका केली. "मन शुद्ध नसेल तर बिसलेरीच्या पाण्याची अंघोळ देखील गटारीच्या पाण्याची वाटू शकते," असा खोचक टोला प्रकाश महाजन यांनी मनसेप्रमुखांना लगावला.

हिंदी भाषिक हिंदूंना जवळ करा, ठाकरे बंधूंना सल्ला

राज ठाकरे यांच्यावर टीका करतानाच महाजन यांनी ठाकरे बंधूंना काही महत्त्वाचे सल्लेही दिले. "आज मी माझ्या सर्व मर्यादा पाळून ठाकरे बंधूंना सल्ला देणार आहे," असे सांगत ते म्हणाले की, "ठाकरेंना दुसऱ्याने दिलेला सल्ला आवडत नाही, हे मला माहीत आहे. मी जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत राजसाहेब ठाकरे हे माझे साहेब आहेत." त्यांनी उद्धव आणि राज ठाकरे यांना उद्देशून आवाहन केले की, "काँग्रेसने महाविकास आघाडीतून तुम्हाला बाजुला केले म्हणजे आता काँग्रेस तुमच्यासोबत निवडणूक लढवणार नाही. ठाकरे बंधूंनी हिंदी बोलणाऱ्या हिंदूंना जवळ करा, त्यांना दूर लोटू नका."

उद्धव ठाकरेंना ब्राह्मणांवरून फटकारले

प्रकाश महाजन यांनी यावेळी उद्धव ठाकरे यांनाही लक्ष्य केले. "उद्धव ठाकरे यांनी ब्राह्मण समाजाला चिडवण्यासाठी टीका केली. उद्धव ठाकरे तुम्ही ब्राह्मणांना हिणवू नका, केवळ ब्राह्मणच शेंडी आणि जानव ठेवतात असे नाही. हिंदू धर्मात कित्येक जातींमध्ये मुंज होते, तिथे जानवे घातले जाते," असे त्यांनी म्हटले.

दोन भाऊ एकत्र आले, पण आम्हाला विसरले

दोन महिन्यांपूर्वीच आपण दोन्ही ठाकरे बंधूंनी एकत्र यावे, अशी भूमिका घेतली होती, ज्यामुळे खूप टीका ऐकावी लागली, याची आठवण महाजन यांनी करून दिली. "दोन भाऊ शेवटी एकत्र आले ही चांगली गोष्ट आहे. नाशिकमध्ये इतका मोठा मोर्चा निघाला. पण, आता दोन भाऊ आम्हालाच विसरून गेले, त्याला आम्ही काय करू शकतो?" अशी खंत त्यांनी व्यक्त केली. बाळासाहेब ठाकरेंच्या हिंदुत्वाचा वारसा एकनाथ शिंदे पुढे घेऊन जात असल्याचेही मत त्यांनी मांडले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ नोव्हेंबर २०२५


## अध्यक्षपदासाठी ७ उमेदवार तर नगरसेवक पदाच्या २० जागांसाठी ७० उमेदवार मैदानात




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगलले) :** ७ उमेदवार वैधअजित चौधरी (शिवसेना उबाठा)चंद्रशेखर मुदकना (शिवसेना शिंदे)रफिक पटेल (राष्ट्रवादी)बापुराव पाटील (भाजप)सिद्धलिंग स्वामी (अपक्ष)प्रशांत पाटील (अपक्ष)लखन भोंडवे (अपक्ष) ४ उमेदवार अवैधश्रीकांत मिनीयार (भाजप)श्रीकांत मिनीयार (भाजप)धनराज मंगरूळे (भाजप)लखन भोंडवे (राष्ट्रवादी)प्रभाग एक अ साठी एकूण तीन अर्ज१) स्नेहा बंडगर (भाजप) वैध२) शहाणा तांबोळी (शिवसेना उबाठा) वैध ३) समरीन लिंबाळे (राष्ट्रवादी) वैधप्रभाग एक ब साठी एकूण पाच अर्ज१) अमर भोसगे (भाजप) वैध२) ओंकार कुंभार (काँग्रेस) वैध३) मनीष ब्याळे (भाजप) अवैध४) सागर धुमुरे (राष्ट्रवादी) वैध ५) शरणाप्पा मुळे (अपक्ष)वैधप्रभाग दोन अ साठी एकूण ६ अर्ज१) प्रशांत स्वामी (भाजप) अवैध२) अशोक अंत्रेडी (राष्ट्रवादी)वैध३) सचिन उंगळवार (भाजप) अवैध४) सचिन फनेपुरे (भाजप)वैध ५) संदीप चौधरी (भाजप) अवैध६) बालाजी राठोड (शिवसेना उबाठा) वैधप्रभाग दोन ब साठी एकूण ६ अर्ज१) श्रीदेवी दुर्गे (भाजप) वैध२) प्रीती धुमुरे (राष्ट्रवादी) वैधप्रभाग क्रमांक तीन अ साठी एकूण ४ अर्ज१) महादेवी बनसोडे (भाजप) वैध२) रेखा गायकवाड (भाजप) अवैध३) वैशाली खरटमल (राष्ट्रवादी) वैध४) मंगल माने (राष्ट्रवादी) अवैधप्रभाग क्रमांक तीन ब साठी एकूण ५ अर्ज१) अहमद मणियार (भाजप) वैध२) निसार मदारसे (भाजप) अवैध३) नसरोद्दीन कुरेशी (राष्ट्रवादी) वैध४) गौस शेख (भाजप) अवैध५) रफिक पटेल (राष्ट्रवादी) अवैधप्रभाग क्रमांक चार अ साठी एकूण ५ अर्ज१) सुलभा अंबुसे (भाजप) अवैध२) निकिता अंबुसे (भाजप) वैध ३) शोभा बेगमपुरे (भाजप) अवैध४) शहाना तांबोळी (शिवसेना उबाठा) वैध५) सुनीता स्वामी (राष्ट्रवादी) वैधप्रभाग क्रमांक चार ब साठी एकूण ८ अर्ज१) निरजानंद अंबर (भाजप) वैध२) कलप्पा पाटील (भाजप) अवैध३) महमदरफिक तांबोळी (शिवसेना उबाठा) वैध४) श्रीकांत मिनीयार (भाजप) अवैध५) सुनील नलावडे (भाजप) अवैध६) राजेंद्र शिंदे (शिवसेना) वैध७) राजकुमार हिरेमठ (अपक्ष) वैध८) किशोर शिंदे (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक पाच अ साठी एकूण ६ अर्ज१) गौस शेख (भाजप) वैध २) चंद्रशेखर माळी (भाजप) अवैध३) सचिन शिंदे (शिवसेना) वैध४) निरजानंद अंबर (भाजप) अवैध५) नसरोद्दीन अंबर (राष्ट्रवादी) वैध६) बालाजी राठोड (शिवसेना उबाठा) वैध प्रभाग क्रमांक पाच ब साठी एकूण ४ अर्ज१) निर्मला कंटेकुरे (भाजप) वैध२) सुरेखा व्हनाळे (शिवसेना उबाठा) वैध३) निर्मला क्षीरसागर (शिवसेना) वैध ४) राजश्री भोंडवे (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक सहा अ साठी एकूण ४ अर्ज १) रुपचंद गायकवाड (भाजप) वैध२)प्रणित गायकवाड (शिवसेना उबाठा) वैध ३)अजिंक्य मुरूमकर (राष्ट्रवादी) वैध४) वैशाली खरटमल (अपक्ष) वैध प्रभाग क्रमांक सहा ब साठी एकूण २ अर्ज१) मुमताजबी ढोबळे (भाजप) वैध२) चांदबी ढोबळे (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक सात अ साठी एकूण ५ अर्ज१) ज्योती शेळके (भाजप) वैद्य२) ज्योती डोंगरे (भाजप) अवैध३) गिरिजाबाई हिंडोळे (शिवसेना उबाठा) वैध४) मधू साखरे (शिवसेना) वैध५) प्रभावती धुमुरे (राष्ट्रवादी)वैध प्रभाग क्रमांक सात ब साठी एकूण ६ अर्ज१) रमेश चव्हाण (भाजप) वैध२) लक्ष्मण शेळके (भाजप) अवैध३) गुलाब डोंगरे (भाजप) अवैध ४) चंद्रशेखर मुदकन्ना (शिवसेना) वैध५) दत्तकुमार हुळमजगे (शिवसेना उबाठा) वैद्य ६) गणेश कडगंचे (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक आठ अ साठी एकूण ५ अर्ज१) ज्योती बन्ने (भाजप) अवैध२) सुनीता बन्ने (भाजप) वैध३) गीरजाबाई हिंडोळे(ठाकरे) वैध४) कांताबाई सूर्यवंशी (शिवसेना) वैध५) समरीन निंबाळे (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक आठ ब साठी एकूण ९ अर्ज१) राजेंद्र बेंडकाळे (भाजप) वैध२) विशाल मोहिते (शिवसेना उबाठा) वैध३) श्रीकांत बेंडकाळे (भाजप) अवैध४) महेश धुमुरे (भाजप) अवैध५) सुरेश मंगरुळे (शिवसेना) वैध६) महेश निंबरगे (शिवसेना उबाठा) अवैध७) व्यंकट बिराजदार (काँग्रेस) वैध८) सिद्राम सोनटक्के (अपक्ष) वैध९) लखन भोंडवे (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक नऊ अ साठी एकूण ५ अर्ज१) समीना मुल्ला (भाजप) वैध२) जयाबाई वाघ (काँग्रेस) वैध३) अवंती फुगटे (भाजप) अवैध४) भाग्यश्री फुगटे (शिवसेना) वैध५) रूकसाना सय्यद (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक नऊ ब साठी एकूण ४ अर्ज१) सूर्यकांत जाधव (भाजप) वैध २) अजित चौधरी (शिवसेना उबाठा) वैध३) प्रल्हाद माळी (शिवसेना) वैध४) मोहन जाधव (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक दहा अ साठी एकूण ५ अर्ज १) मंगल बनसोडे (भाजप) अवैध२) रागिनी गायकवाड (भाजप) वैद्य३) महादेवी गायकवाड (शिवसेना उबाठा) वैध४) विजयालक्ष्मी गायकवाड (भाजप) अवैध५) मंगल माने (राष्ट्रवादी) वैध प्रभाग क्रमांक दहा ब साठी एकूण ४ अर्ज१) सिद्रासय्या ख्याडे (भाजप) वैध२) महेश हिंडोळे (शिवसेना उबाठा) वैध३) संजय वाडीकर (भाजप) अवैध४) सिद्रामप्पा बोराळे (राष्ट्रवादी) वैध

## नागरिकांचा जाहीरनामा (शपथपत्रे लिहून घ्या)

**सटाणा (डॉ. सुधीर देवरे) :** सटाणा नगरपालिकेची निवडणूक जवळ आली. उमेदवार प्रचार करु लागलेत. उमेदवारांच्या जाहीरनाम्यात खालील गोष्टींचा उल्लेख आहे की नाही खात्री करुन घ्या. आणि तसे सामुदायिक शपथपत्रेही लिहून घ्या.1. अव्वाच्यासव्वा - अवास्तव घरपट्टी कमी करणे आणि यावर्षी होत असलेली घरपट्टी वाढ त्वरीत रद्द करणे. नंतर समान मालमत्ता- समान कर कडे वाटचाल करणे.2. सटाणा डुक्करमुक्त, गुरेमुक्त, कुत्रेमुक्त, गाढवमुक्त, डासमुक्त, कचरामुक्त करणे. (आता गाढवेही फिरतात शहरभर).3. अतिक्रमणे हटवणे.4. नागरिकांच्या आरोग्यासाठी विशेष सुविधा पुरवणे.5. चार-पाच महिण्यात निकामी होणारे रस्ते नको... किमान 10 वर्षे शाश्वतीचे रस्ते द्या.6. आरम नदी प्रदुषणमुक्त करणे. नदीच्या दोन्ही थड्यांवर, रस्त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे, नदीवर बंधारे बांधणे. 7. दर्जेदार, टिकाऊ असणाऱ्या आणि धोकेदायक न ठरणाऱ्या शंभर वर्ष शाश्वतीच्या भुयारी गटारी बांधणे.8. शहरातल्या सर्व Open Places - राखीव भूखंड मोकळे करुन नागरिकांसाठी खुले करणे.9. शहरात सुसज्ज आणि दर्जेदार पुस्तकांचे संदर्भ ग्रंथालय उभारणे.10. रात्री प्रत्येक घर Street Light टप्प्यात असेल.11. बायपास / रिंग रोड त्वरीत पूर्ण करणे. हे सगळे सामुदायिक पध्दतीने लिहून घ्या, नंतरच मतदान करा.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ नोव्हेंबर २०२५


## कन्नड–सोयगाव, वैजापूर मतदारसंघातील दिग्गजांचा भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश




**कन्नड (अरुण थोरात) :** मित्र पक्षासह प्रमुख विरोधी पक्षांना धक्का देत कन्नड सोयगाव कन्नड तालुक्यातील दिग्गज नेत्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते पक्ष प्रवेश केला आहे. भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात आयोजित विशेष कार्यक्रमात कन्नड–सोयगाव व वैजापूर विधानसभा मतदारसंघातील विविध पक्षांचे माजी पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमास भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच राज्याचे ओबीसी कल्याण, अपारंपरिक ऊर्जा व पशुसंवर्धन मंत्री अतुलजी सावे, माजी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री व खासदार डॉ. भागवत कराड, प्रदेश सरचिटणीस आ. संजय केनेकर, मराठवाडा विभाग संघटन मंत्री संजय दादा कोडगे, भाजपा जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, प्रदेश सचिव किरण पाटील, शहर जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे, तसेच श्री. जी. बोराळकर, अनिलजी मकरिये, राजू शिंदे, मंडलाध्यक्ष संदीप ठोंबरे, सुनील जाधव, जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील जगताप, अविनाश पाटील गलांडे, रामभाऊ मुळे, हरीश वाघ, कैलास पवार यांची उपस्थिती होती.

या वेळी भाजपात प्रवेश केलेले प्रमुख नेते- शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती धनराज बेडवाल, कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठानचे सचिव राजेश शिवाजीराव बनकर पाटील, सोयगाव काँग्रेस कमिटीचे माजी तालुकाध्यक्ष धनंजय भास्कर पाटील, डॉ. पुंडलिक महालपुर, वैजापूरचे माजी आमदार स्व. आर. एम. वाणी यांचे सुपुत्र सचिन वाणी, शिवसेना शहरप्रमुख वैजापूर प्रकाश चव्हाण, कृषी उत्पन्न बाजार समिती वैजापूरचे संचालक देविदास वाणी, माजी नगरसेवक लिमेश वाणी, तसेच दोन्ही मतदारसंघातील मोठ्या संख्येने सरपंच, उपसरपंच व स्थानिक लोकप्रतिनिधींनी भारतीय जनता पार्टीमध्ये जाहीर प्रवेश केला. या भव्य प्रवेशामुळे कन्नड–सोयगाव व वैजापूर या दोन्ही मतदारसंघांत भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक ताकद आणखी भक्कम झाल्याचे पक्ष नेत्यांनी सांगितले.

## स्थानिक निवडणुकीच्या रणधुमाळीत ५ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच ५ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले. या आदेशानुसार, सध्या पुण्यातील यशदा येथे उपमहासंचालक पदावर कार्यरत असलेले त्रिगुण कुलकर्णी यांची नियुक्ती इयत्ता १० वी आणि १२ वीच्या शिक्षण बोर्डाच्या अध्यक्षपदी करण्यात आली आहे. त्रिगुण कुलकर्णी यांच्यासोबतच राहुल रंजन महिवाल, प्रकाश खपले, डॉ. मंजिरी मानोलकर, अंजली रमेश या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

**या अधिकाऱ्यांची झाली बदली**

१. राहुल रंजन महिवाल यांची महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

२. प्रकाश खपले आयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर यांची महाराष्ट्र राज्य मत्स्यव्यवसाय महामंडळ, मुंबई येथील व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

३. डॉ. मंजिरी मानोलकर व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे यांची आयुक्त, आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

४. त्रिगुण कुलकर्णी उपमहासंचालक, यशदा, पुणे यांची अध्यक्ष, एसएससी आणि एचएससी बोर्ड, पुणे येथे नियुक्ती करण्यात आली आहे.

५. अंजली रमेश मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांची आयुक्त, मृदा आणि जलसंधारण, छत्रपती संभाजी नगर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार १९ नोव्हेंबर २०२५


# पुरुषांच्या नि:शब्द संघर्षांचा समाजशास्त्रीय मागोवा

१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा 'आंतरराष्ट्रीय पुरुष दिन' हा केवळ एका लिंगाच्या गौरवाचा दिवस नसून, पुरुषांनी समाजात निभावलेल्या विविध भूमिका, त्यांचे योगदान, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि त्यांच्यावर होणाऱ्या अदृश्य सामाजिक दाबांविषयी गंभीर आत्मचिंतन करण्याची संधी उपलब्ध करून देणारा दिवस आहे. स्त्रियांप्रमाणेच पुरुष देखील संवेदनशील, भावनिक, कधी कमकुवत तर कधी अत्यंत सहनशील असतात; परंतु सामाजिक रचनेच्या पायामध्ये रुतलेली 'पुरुष म्हणजे बलाढ्य, कणखर, भावनाशून्य' ही गुंतागुंतीची प्रतिमा पुरुषांच्या अनेक समस्यांना गडद सावलीतच ठेवते. या न बोलल्या जाणाऱ्या संघर्षांमध्ये 'कामाच्या ठिकाणी पुरुषांवर होणारे खोटे आरोप' ही अत्यंत गंभीर आणि वाढत चाललेली समस्या आहे, जी पुरुषांच्या मानसिक आरोग्याला, कामाच्या सुरक्षिततेला, प्रतिष्ठेला आणि एकूण सामाजिक जीवनाला खोलवर बाधा पोहोचवते. या मुद्द्यावर वस्तुनिष्ठ, संतुलित आणि समाजशास्त्रीय नजरेतून विचार करणे आवश्यक आहे.कामाच्या ठिकाणी लैंगिक छळवणूक, वाईट वर्तणूक, नैतिक अध:पतन, अन्यायकारक वागणूक किंवा सत्ता शक्ती संबंधित प्रश्नांची तक्रार करणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि स्त्रियांना वंचिततेच्या इतिहासामुळे कायदेशीर संरक्षणाची गरज देखील उद्भवते. परंतु संरक्षणाची रचना जेव्हा पक्षपाती समजुतींनी किंवा चुकीच्या वापरामुळे बिघडते, तेव्हा ती पुरुषांसाठी नि:शब्द आपत्ती ठरू शकते. अनेक पुरुषांना कोणताही सबळ पुरावा नसताना आरोप झाल्यास ताबडतोब दोषी ठरवले जाते, चौकशी होण्यापूर्वीच त्यांच्या प्रतिमेवर बाजारातील धूळ उडते, नोकरीवर परिणाम होतो तर कधी वैयक्तिक आयुष्यही उद्ध्वस्त होते. खोटे आरोप हा स्त्री-पुरुष संघर्षाचा विषय नसून 'लिंगभाव रूढीवादा''शी संबंधित सामाजिक समस्या आहे हे वारंवार अधोरेखित करणे आवश्यक आहे.भारतीय समाजरचना पितृसत्ताक असली तरी त्यातील भूमिका आणि अपेक्षा अत्यंत गुंतागुंतीच्या आहेत. पितृसत्तेला पुरुषांचे विशेषाधिकार म्हणून पाहिले जाते, परंतु त्याच प्रणालीच्या दबावाखाली पुरुषांवर 'कुटुंबाचा भार पेलणारा', 'आर्थिक आधार', 'शक्तिशाली संरक्षक' अशी सामाजिक अपेक्षा लादली गेली आहे. या चौकटीमुळे पुरुषांना मानसिक तणाव, भावनिक कोंडी, नैराश्य यांसारख्या समस्यांकडे स्वाभाविकपणे दुर्लक्ष करावे लागते. खोट्या आरोपांचे संकट हेही या दबावाशी जोडलेले आहे, कारण समाज सामान्यतः "पुरुष म्हणजे दोषी असू शकतो" या पितृतुल्य पूर्वग्रहातून प्रकरणांकडे पाहतो. यामुळे पुरुषांना स्वतःच्या निष्पापतेसाठी लढताना देखील अपराधीपणाचा कलंक सहन करावा लागतो.कामाच्या ठिकाणचा सामाजिक स्तरिकरणाचा सिद्धांत सांगतो की शक्ती, श्रेणी, अधिकार आणि संसाधनांचे वितरण हे नेहमीच संघर्ष निर्माण करणारे असते. जेव्हा स्त्रियांना न्याय संरक्षणासाठी विशेष कायदे निर्माण केले गेले, तेव्हा त्या कायद्यांचा उद्देश अत्यंत योग्य होता. परंतु शक्तीचा गैरवापर हा सार्वत्रिक मानवी गुण असल्याने त्याचा वापर कोणत्याही लिंगाकडून चुकीच्या पद्धतीने केला जाऊ शकतो. अलीकडील काळात अधिकारसंपन्न पदांवरील वाद, बढतीच्या प्रक्रिया, वैयक्तिक वाद, कार्यस्थळातील स्पर्धात्मक मानसिकता किंवा एखाद्या पुरुषाची प्रतिमा खराब करण्यासाठीही खोट्या आरोपांचा वापर होत असल्याचे विविध अभ्यास, संस्थात्मक अहवाल आणि न्यायालयीन प्रकरणे दाखवतात. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर खोटे आरोप हे केवळ व्यक्तीगत वाद नसून स्वतंत्र ओळखीच्या संघर्षाचे, सत्तेच्या असमतोलाचे आणि संस्थात्मक रचनेतील त्रुटींचे प्रतिबिंब आहे.पुरुषांवरील खोट्या आरोपांचा परिणाम शारीरिक नसला तरी मानसिकदृष्ट्या अत्यंत भयंकर असतो. पहिला आघात म्हणजे 'प्रतिष्ठेची हत्या', कारण समाजातील लोक आरोप झालेल्या पुरुषाकडे 'सत्य उलगडण्यापूर्वीच' संशयाने पाहतात. दुसरा परिणाम म्हणजे रोजगार हरवण्याची भीती. अनेक कंपन्या प्रकरणाचे सत्य समजून घेण्यापूर्वीच कर्मचाऱ्याला निलंबित करतात. काही वेळेस पुरुष आरोपी निष्पाप असल्याचे सिद्ध झाले तरी त्याच्या परत येण्याने सहकाऱ्यांमध्ये निर्माण झालेली दूरी, संशय, कुजबुज आणि तिरस्काराची भावना कायमच राहते. तिसरा आणि सर्वात खोलवर परिणाम म्हणजे मानसिक आरोग्याचा ऱ्हास होय. नैराश्य, असहायता, आत्मदोष, भीती, राग आणि कधी कधी आत्महत्येच्या विचारांपर्यंत परिस्थिती पोहोचते. संशोधन दर्शवते की प्रतिष्ठा आणि रोजगार या दोन गोष्टी पुरुषांच्या आत्मसन्मानाशी घट्ट निगडित असतात; आणि जेव्हा दोन्ही गोष्टी ढवळून निघतात तेव्हा व्यक्तीची मानसिक रचना उद्ध्वस्त होते.समाजशास्त्रीय सिद्धांतांनुसार, कोणत्याही समाजात न्यायव्यवस्था ही तटस्थ असली पाहिजे; परंतु जेव्हा कायदे एका लिंगासाठीच संरक्षक आणि दुसऱ्यासाठी संभाव्य आरोपीचे स्थान निर्माण करतात, तेव्हा न्यायसंगततेचा समतोल ढासळण्याची शक्यता वाढते. पुरुषांविरोधातील खोटे आरोप हा स्त्रियांना दिलेल्या संरक्षणाचा विरोध नाही, तर त्या संरक्षणाचा निष्पक्ष वापर व्हावा यासाठीचा आग्रह आहे. उघड चर्चा टाळली जाते कारण अनेकांना भीती वाटते की पुरुषांवरील अन्यायाचा मुद्दा उपस्थित केला तर स्त्रियांच्या अधिकारवाढीच्या चळवळीला विरोध केल्याचा ठपका बसू शकतो. परंतु सामाजिक वास्तव हे कधीच एकतर्फी नसते. प्रत्येक समस्येचे अनेक थर असतात, आणि 'लिंगभाव न्याय' म्हणजे एका लिंगाचा विजय नव्हे तर दोन्ही लिंगांना न्याय देणारी समतोल प्रणाली होय. कामाच्या ठिकाणी खोट्या आरोपांमुळे निर्माण होणारे सामाजिक वर्तुळसुद्धा महत्त्वाचे आहे. एक आरोप एखाद्या पुरुषाला केवळ आरोपी बनवत नाही, तर त्याच्या कुटुंबालाही सामाजिक नजरेत संशयास्पद बनवतो. पुरुषांच्या पत्नी, मुलं, आई-वडील या सगळ्यांना समाजाच्या प्रश्नांना उत्तर द्यावे लागते. या परिस्थितीमधून उभा राहणारा सामाजिक ताण हा लिंगनिर्भर नसून कौटुंबिक ताण असतो. आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पहिल्यास संस्थात्मक आरोप, न्यायप्रक्रियेतील विलंब, संस्थात्मक अविश्वास आणि सार्वजनिक प्रतिषेध हे सर्व त्या कुटुंबाच्या सामाजिक भांडवलावर गदा आणतात.या समस्येचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे 'पुरुषांची शांतता' होय. पुरुषांना त्यांच्या समस्या बोलून दाखवण्यास समाज परवानगीच देत नाही. "तू पुरुष आहेस, तग धरा", "काही नाही होत अशाने", "तुझ्यावर कोण विश्वास ठेवेल?" अशा सामाजिक अपेक्षा पुरुषांच्या तोंडावरच कुलूप लावतात. पुरुषांच्या समस्यांसाठी समर्पित मानसिक आरोग्य सेवा, समुपदेशन केंद्रे, कायदेशीर मार्गदर्शन संस्था किंवा समता मंच अत्यल्प आहेत. कारण समाजाने पुरुषांना कधीही 'पीडित' म्हणून पाहिलंच नाही. अशा परिस्थितीत खोट्या आरोपांचा मुद्दा हा केवळ कायदेशीर विषय राहत नाही; तो सामाजिक चेतनेचा, भावनिक न्यायाचा आणि मानवी प्रतिष्ठेच्या पुनर्स्थापनेचा प्रश्न ठरतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहिले तरी विविध देशांमध्ये 'पुरुषांचे हक्क' किंवा 'लिंगभाव तटस्थ कायदे' यांविषयी चर्चा वाढत आहे. अनेक विकसनशील आणि विकसित देशांमध्ये कायदे लिंगभाव निरपेक्ष करण्याची मागणी वाढत चालली आहे, कारण वास्तव असे आहे की 'अन्याय हा स्त्री-पुरुष दोघांवरही होऊ शकतो'. कार्यस्थळातील तक्रार निवारण समित्यांनीही दोन्ही बाजूंची बाजू निष्पक्षपणे ऐकून निर्णय देण्याची गरज आहे. 'सिद्ध होईपर्यंत दोषी' अशी प्रतिकूल न्यायसंस्कृती पुरुषांमध्ये फोफावू नये. आरोप योग्य असल्यास कडक कारवाई व्हावी, पण आरोप खोटे असल्यास तितक्याच कठोरपणे त्या गैरवापराचीही दखल घेतली जावी, हेच न्यायाचे संतुलन असावे.या सर्व विचारांमधून उलगडते की पुरुषांवरील खोट्या आरोपांचा प्रश्न हा केवळ काहींना भेडसावणारी समस्या नाही; ती 'समाजाच्या समतोलाच्या आणि न्यायव्यवस्थेच्या गुणवत्तेच्या' मापदंडाकडे बोट दाखवते. आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाचा उद्देश पुरुषांचे गौरवगान करणे नसून त्यांच्या नि:शब्द संघर्षांना समाजाच्या केंद्रस्थानी आणणे हा आहे. पुरुषांनी कमकुवत होण्यास किंवा वेदना व्यक्त करण्यास कोणतीही लाज वाटू देऊ नये; समाजानेही पुरुषांच्या वेदनांना समजून घेण्याचा मानवी दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे.१९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुरुष दिवसाच्या निमित्ताने, समाज म्हणून आपल्याला हे मान्य करावे लागेल की 'जेंडर जस्टिस म्हणजे दोन्ही बाजूंच्या वेदनांना समान न्याय देणे होय'. स्त्रियांच्या सुरक्षिततेसाठीचे कायदे महत्त्वाचे आहेत, पण त्याचबरोबर पुरुषांना खोट्या आरोपांपासून संरक्षण देणारी संवेदनशील आणि तटस्थ चौकट उभी करण्याची गरजही तेवढीच मोठी आहे. नातेसंबंध, कार्यसंस्कृती आणि समाजव्यवस्था एका लिंगाच्या आधारावर नव्हे तर मानवी मूल्यांच्या आधारावर उभी राहिली पाहिजे. पुरुषांचे योगदान, त्यांची सहनशीलता, त्यांचे मानसिक संघर्ष आणि त्यांच्यावर होणारे संभाव्य अन्याय हे सर्व समाजाच्या अभ्यासाचा, चर्चेचा आणि धोरणनिर्मितीचा विषय बनले पाहिजे.एक संतुलित, न्याय्य आणि मानवी मूल्यांनी युक्त समाज निर्माण करण्यासाठी पुरुष आणि स्त्रियांमध्ये संघर्ष नव्हे तर संवाद आवश्यक आहे. खोटे आरोप हा संवाद तोडणारा घटक आहे आणि त्यामुळेच त्यावर चर्चेची गरज अधिक महत्वपूर्ण ठरते. पुरुषांच्या नि:शब्द संघर्षांना आवाज देणे म्हणजे स्त्रीहिताच्या विरोधात जाणे नव्हे, तर न्यायाच्या तत्त्वांना उंचावणे आहे. कारण जिथे न्याय सर्वांसाठी आहे, तिथेच समाज अधिक समतोल, संवेदनशील आणि प्रगतिशील होऊ शकतो.




**डॉ. राजेंद्र बगाटे**

(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) मो. ९९६०१०३५८२, ईमेल - bagate.rajendra5@gmail.com


## माय

मावळला सूर्य
अंधारलं आभाळ
अनवाणी पायांनी
माय फिरे रानोमाळ

खाचखळग्यातूनी
माय चाले भराभर
थकली भागली तरी
मोळी डोक्यावर

मीठभाकरी विना
व्याकूळला जीव
चालून थकली
दूर दिसे गाव

पक्षी परतले घरट्यात
काळोख दाटला
बाभळीला अडकूनी
जिर्न पदर फाटला

आमच्याकडे पाहून
माय विसरते दुःख
आमच्यातच शोधते
ती उद्याचं सुख




**- रवींद्र चालीकवार**

मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९९०६


## दिवा पेटता घेऊन

खोल मनाच्या डोहात
वेदनेचा रे सागर
नसानसात लाटांचा
कसा वार आरपार

येई भरती स्वप्नांची
दशदिशा गाठायला
भाळी रिकामी ओहोटी
वास्तवात भेटायला

रंग निळाई सागर
स्पर्श जसा आकाशाचा
धाव क्षितिजाच्या पार
खेळ ऊन सावल्यांचा

थेंब पावसाचे चार
कधी वादळांचा भार
कधी क्षणिक शांतता
कधी भरलेला उर

उभा मनाचा सागर
पाय लाटांवर रोवून
ठाम उभा अंधारात
दिवा पेटता घेऊन


**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**
**मो. ९४०३३ ८४८८९**



मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा..
अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com